महाराष्ट्र शासन
वन विभाग
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक
"अरण्य संकुल" जुना मुंबई आग्रा रोड, राम गणेश गड करी चौक,त्र्यंबक नाका,नाशिक
दूरध्वनी क्र.०२५३-२५९७८४५ फॅक्स २५९८५४५ ई-मेल : ccfnashik२०१२@gmail.com, ccftnashik@mahaforest.gov.in

जा.क्र.कक्ष-2/जमीन/प्र.क्र./2016.17/ 1240 /सन 2021-22 दिनांक :- 11 /03/2022

पत्र

प्रति,

मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, नागपुर

विषय :- वनजमीन - नाशिक
प्रवाही वळण योजनेकरिता मौ.ननाशी, ता.दिंडोरी, जि.नाशिक येथील 3.48 हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वळती करणेबाबत

संदर्भ :- 1) शासन महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई- 32 यांचेकडील पत्र क्रमांक एफएलडी-1521/प्र.क्र.233/फ-10, दिनांक 07/01/2022
2) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-2/जमीन/1036,दिनांक 27/01/2022
3) उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांचे पत्र क्रमांक कक्ष-3/जमीन कॅम्पा/1867, दिनांक 10/03/2022

प्रस्तुत विषयांकित प्रकरणी संदर्भिय क्रमांक 1 चे शासन पत्रान्वये मुद्या क्रमांक 1 ते 4 बाबतचे स्पष्टीकरण सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार मुद्या क्रमांक 2 बाबतचा अहवाल या कार्यालयाचे संदर्भिय क्रमांक 2 चे पत्रांन्वये सादर करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | तपशिल | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| 1 | मुद्या क्रमांक2-पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावीत करण्यात आलेली जमीन डोंगराळ व मध्यम उताराची असल्याचे नमूद केले आहे KML File च्या निरिक्षणावरुन सदर क्षेत्र जास्त उताराचे असल्याचे दिसून येते. सबब मुख्य वनसंरक्षक प्रा.नाशिक यांनी स्थळ पाहणी करुन सदर क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी योग्य आहे किंवा कसे ? | प्रकरणी निम्नस्वाक्षरीकर्ते यांनी दिनांक 21/01/2022 रोजी भेट देवून उक्त विषयांकित प्रस्तावासाठी पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या जमीनीचे स्थळ निरिक्षण केले त्यावेळी असे आढळून आले की, सदर क्षेत्र हे उताराचे तर आहेच त्याशिवाय साधारणत: 50 % क्षेत्रात खडक व खडकांपासून तयार झालेले दगड मोठया प्रमाणात आहेत. सदर क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी सुयोग्य नाही असे प्रकल्प यंत्रणेस कळविण्यात आले. त्याअनुषंगाने प्रकल्प यंत्रणेने सदर जमीन आणि दुप्पट अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण करण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम भरण्यास तयार असलेबाबत हमीपत्र सादर केले आहे. सदर हमीपत्राची प्रत सोबत जोडून सादर करण्यात येत आहे. |

उर्वरीत मुद्या क्रमांक 1, 3 व 4 बाबतचा अहवाल उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांनी संदर्भिय पत्र क्रमांक 3 अन्वये या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अहवालाची प्रत सोबत जोडून सादर करण्यात येत असून उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांनी सादर केलेल्या अहवालाशी सहमती दर्शविण्यात येत आहे.

( नितिन गुदगे )
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
नाशिक

**प्रतिलिपी :-** उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीसाठी अग्रेषित

**प्रतिलिपी :-** कार्यकारी अभियंता, आदिवासी सार्वजनीक बांधकाम विभाग, कळवण यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीसाठी अग्रेषित

महाराष्ट्र शासन

वन विभाग,

दूरध्वनी क्र.(०२५३) २५७२७३०          उप-वनसंरक्षक,पश्चिम भाग, नाशिक यांचे कार्यालय.
Email ID :dycfnashikwest@mahaforest.gov.in  उंटवाडी वन विश्रामगृह आवार,संभाजी चौक, नाशिक ०२.

जा.क्र.कक्ष-३/जमिन/कॅम्पा/ ९८६७ / सन २०२१-२२                    दिनांक१० /०३/२०२२.

प्रति,

म.मुख्य वनसंरक्षक,
(प्रादेशिक) नाशिक

**विषय :-**वनजमीन-नाशिक
प्रवाही वळण योजनेकरिता मौजे ननाशी ता.दिंडोरी जि.नाशिक येथील ३.४८ हे.वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम,१९८० अंतर्गत वळती करण करणे.

**संदर्भः-** १.महसुल व वनविभाग, मंत्रालय मुंबई पत्र क्र.एमएलडी-१५२१/प्र.क्र.२३३/फ-१० दिनांक ०७.०१.२०२२
२.आपले कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२/जमीन/२५४९ दिनांक १०/०१/२०२२
३.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-३/जमीन/कॅम्पा/२५४४ दिनांक १३.०१.२०२२
४.कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग नाशिक यांचे कडील पत्र क्र.लपाविना/भुसं./ २०१ दिनांक २४/०१/२०२२

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्र. १ व २ अन्वये प्रवाही वळण योजना ननाशी ३.४८ हेक्टर वनजमीन वळतीकरण प्रस्तावा अंतर्गत १ ते ३ त्रुटी उपस्थित करण्यात आलेल्या होत्या

त्या अनुषंगाने संदर्भिय पत्र क्र.४ अन्वये संबंधित यंत्रणा व या विभागाने उपस्थित १ ते ३ त्रुटीची पुर्तता केलेली असुन पुर्तता अहवाल सोबत जोडून सादर करण्यांत येत आहे.

तरी प्रस्ताव प्रकरणी पुढील आवश्यक कार्यवाही आपले स्तरावरुन व्हावी हि विनंती.

**सहपत्रः- वरील प्रमाणे.**

(पंकज गर्ग)
**उप.वनसंरक्षक,**
**पश्चिम भाग, नाशिक**

**प्रवाही वळण योजना मौजे ननाशी ता. दिडोरी जि. नाशिक येथील ३.४८ हे. वनक्षेत्र वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत वळतीकरण करणे बाबत.**

| अ.नं. | त्रुटी | पुर्तता |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित वनजमीन वळतीकरणामुळे वनजमिनीचे ४-५ तुकडे पडतात. सदर तुकडया तुकडयातील वनजमिनीचे संवर्धन, संरक्षण व व्यवस्थापन करण्यांस अडचणी उदभवणार नाहीत का.१ | प्रस्तावित वनजमीन वळतीकरणामुळे वनजमिनीचे सदयः स्थितीत अस्तित्वातील प्रमुख ननाशी ते बा-हे जिल्हा मार्ग रस्त्यामुळे गट नं.१४१ व १९३ यांचे याअगोदरच सदर वनजमिनीचे तुकडे झालेले आहेत. सदर जागेतून प्रवाही वळण योजना ननाशीचा वळण कालवा प्रस्तावित केल्यामुळे आणखी दोन भाग जास्त होणार आहेत. (वळतीकरण नसलेला कालव्याचा नकाशा व वळतीकरण असलेला कालव्याचा नकाशा सोबत जोडलेला आहे)<br>वन्यजीवांचा वावर असल्याने संबंधित यंत्रणेस व्यवस्थापन व उपाय वन विभागाने सुचविलेले आहेत.<br>तसेच या योजनेस लागूनच वनविभागाची रोपवाटिका असुन या योजनेतून सदर यंत्रणा रोपवाटीकेसाठी मोफत पाणी उपलब्ध करुन देणार आहेत.त्यामुळे वन संवर्धन होण्यांत मदत मिळणार आहे. |
| ३. | कालव्याची लांबी व रुंदी नमुद करणे आवश्यक आहे. | कालव्याची वनजमिनीतील एकुण लांबी.१३९९ मी. असुन सरासदी रुंदी २४.०० मी असल्याचा लेखी रिपोर्ट केलेला आहे.<br>कमीत कमी-२० मी. व जास्तीत जास्त.-५५ मी. |
| ४. | प्रस्तावित ठिकाणी वन्यजीवांचा वावर असल्याचे उपवनसंरक्षक यांच्या अहवालात नमुद आहे. त्यामुळे त्यांच्या मुक्तसंचारासाठी प्रस्तावित कालव्यावरुन रस्त्याची व्यवस्था करण्यांत आली आहे किंवा कसे.१ | प्रस्तावित ठिकाणी वन्यजीवांचा वावर असुन त्यांच्या मुक्त संचारासाठी प्रस्तावित कालव्यावर वनविभागाचे आवश्यकते प्रमाणे संबंधीत यंत्रणेकडुन वेगवेगळे ठिकाणावर रस्त्याची व्यवस्था करण्यांत येणार असल्याचे लेखी रिपोर्ट केलेला आहे. |

(पंकज गर्ग)
उपवनसंरक्षक
**पश्चिम भाग नाशिक**

# हमीपत्र

संदर्भ:- मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नाशिक यांचे पत्र जा.क्र.कक्ष-२/जमीन/प्र.क्र.०४/२०२१-२२/२०३६/ दि. २७/०१/२०२२

प्रवाही वळण योजना-ननाशी, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील ३.४८ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रकल्प यंत्रणेकडून दुप्पट अवनत वन क्षेत्रावर पर्यायी वनीकरणासाठी आवश्यक असणारी रक्कम व जमीन अदा करण्याचे प्रकल्प यंत्रणेकडून हमीपत्र देण्यात येत आहे.

कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग
नाशिक

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ
*लघु पाटबंधारे विभाग, नाशिक*
सिंचन भवन, त्र्यंबकरोड, नाशिक-४२२ ००२
दुरध्वनीक्र (कार्यालय) (०२५३) २३१५४८५
**E-mail :** eemid_nsk@dataone.in

जा.क्र.- लपाविना/प्रशा /४६५/ सन २०२२. दिनांक: १० / ०२ /२०२२

प्रति,
उप वनसंरक्षक (पश्चिम भाग),
नाशिक

विषय :- **वनजमीन- नाशिक.**
प्रवाही वळण योजनेकरिता मौजे ननाशी, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील ३.४८ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत.

संदर्भ:- १) महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. एफएलडी-१५२१/ प्र. क्र. २३३/ फ-१० दि. ०७/०१/२०२२
२) मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नाशिक यांचेसमवेत दि. ०१/०२/२०२२ रोजी झालेली क्षेत्रीय भेट
३) मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नाशिक यांचेसमवेत दि. ०८/०२/२०२२ रोजी झालेली चर्चा
४) उपविभागीय कार्यालयाचे पत्र जा.क्र./मुकासउपपां/भुसं/७६/ दि. ०८/०२/२०२२

वरिल विषयान्वये, प्रवाही वळण योजनेकरिता मौजे ननाशी, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथील ३.४८ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भिय पत्र क्र. १ नुसार घेतलेल्या मुद्दा क्र. १ अन्वये, प्रस्तावित वनजमीन वळतीकरणामुळे वनजमिनीचे ४-५ तुकडे पडतात. सदर तुकड्याबाबत वनजमिनीचे संवर्धन, संरक्षण व व्यवस्थापन करण्यास अडचणी उद्भवणार किंवा कसे याबाबत नमुद केलेले आहे.

याबाबत, मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नाशिक यांच्या समवेत संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये, दि. ०१/०२/२०२२ रोजी प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणी करण्यात आलेली असून सदर क्षेत्रीय पाहणीमध्ये वनजमिनीची आजरोजीची क्षेत्रीय परिस्थिती व ननाशी वळण काळवा प्रस्तावित करण्याचा आराखडा, नकाशे इ. पाहणी दरम्यान दाखविण्यात आलेले आहे. त्यानुसार संदर्भीय पत्र क्र. १ मधील, मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने, क्षेत्रीय अहवाल खालीलप्रमाणे आहे.

प्रस्तावित वनजमीन वळतीकरणामुळे वनजमिनीचे सद्य:स्थितीत अस्तित्वातील प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्यामुळे गट नं १४१ व १९३ यांचे याअगोदरच सदर वनजमिनीचे ४ भाग झालेले आहेत. सदर जागेतून प्रवाही वळण योजना ननाशीचा वळण कालवा प्रस्तावित केल्यामुळे फक्त दोनच भाग जास्त होणार आहेत, त्यांचा तपशिल सोबत जोडलेल्या नकाशांप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

हे आपले माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

सोबत:- १) वरिलप्रमाणे


(सचिन पाटील)
कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग
नाशिक

प्रत:- मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नाशिक यांना माहितीसाठी
प्रत:- मा. मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश नाशिक, यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- मा. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- सहाय्यक अभियंता श्रेणी-1, मुळा कालवा सर्वेक्षण उपविभाग, पांडाणे यांना माहितीसाठी व पाठपुरावा करणेसाठी रवाना.

उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांचे कार्यालय, नाशिक
दिनांक: 21 FEB 2022
आवक क्रमांक : 6035
कार्यालय अधिक्षक

d:\आ-7\भुसं\a नगर-2020\ननाशी उपवनसंरक्षक वनविभाग प्राधिकरणास पत्र दि. 10.02.2022.docx

# GRAVITY DIVERSION SCHEME NANASHI TAL.DINDORI, DIST. NASHIK




PLAN OF DIVERSION CANAL THROUGH FOREST


**AREA STATEMENT**

| Sr. NO. | GUT NO. | | COLOUR CODE | AREA IN SQ.M. |
|---|---|---|---|---|
| 1 | 141 | A | | 960.34 |
| | | B | | 2194.03 |
| | | C | | 67065.75 |
| 2 | 193 | D | | 86470.52 |
| | | E | | 96574.59 |
| | | F | | 1623.57 |

Assistant Engineer (Grade-1)
Mula Canal Survey Sub- Division
Pandane, Tal. Dindori, Dist. Nashik

Executive Engineer
Minor Irrigation Division
Nashik

GRAVITY DIVERSION SCHEME NANASHI TAL.DINDORI, DIST. NASHIK




PLAN OF WITHOUT DIVERSION
CANAL OF FOREST LAND

| AREA STATEMENT | | | | |
|---|---|---|---|---|
| Sr. NO. | GUT NO. | | COLOUR CODE | AREA IN SQ.M. |
| 1 | 141 | A | | 67065.75 |
| | | B | | 16897.080 |
| 2 | 193 | C | | 203510.35 |
| | | D | | 1623.57 |

Assistant Engineer (Grade-1)
Mula Canal Survey Sub- Division
Pandane, Tal. Dindori, Dist. Nashik

Executive Engineer
Minor Irrigation Division
Nashik